चाणक्य मंडल परिवार

**प्रश्नपुस्तिका क्रमांक CMPT000**

**BOOKLET No.**

**प्रश्नपुस्तिका**

**Paper 11**

**वेळ : 1 (एक) तास**

**एकूण प्रश्न : 50**

**एकूण गुण : 100**

---

## सूचना

(1) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

(2) सदर प्रश्नपुस्तिकेत **50** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

(3) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनात बॉलपेनने लिहावा.

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे.**

(5) **ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत.

(8) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील''.**

(9) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे.

*****

चाणक्य मंडल परिवार

1. खालीलपैकी कोणत्या भारतीय राज्यात एकसदनीय विधानमंडळ आहे?

(1) बिहार (2) ओडिशा

(3) उत्तर प्रदेश (4) कर्नाटक

Which of the following Indian states has a unicameral legislature?

(1) Bihar (2) Odisha

(3) Uttar Pradesh (4) Karnataka

---

2. विधानसभेचे सदस्य होण्यासाठी खालीलपैकी कोणते निकष आहेत?

(1) ती व्यक्ती भारताची नागरिक असणे आवश्यक आहे.

(2) तिने वयाची पंचवीस वर्षे पूर्ण केलेली असावीत.

(3) तिने संबंधित राज्यातील विधानसभा मतदारसंघात मतदार म्हणून नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे.

(4) वरीलपैकी एकापेक्षा जास्त निकष आहेत.

Which of the following are the criteria to become a member of the Legislative Assembly?

(1) The person must be a citizen of India.

(2) She must have completed the age of twenty-five years of age.

(3) She must be registered as a voter in assembly constituency in the concerned state.

(4) More than one of the above criteria.

---

3. खालीलपैकी कोणत्या राज्यात द्विसदनीय विधानसभा आहे/त?

(अ) आंध्र प्रदेश (ब) तेलंगणा

(क) बिहार (ड) उत्तर प्रदेश

खालीलपैकी योग्य उत्तर निवडा:

(1) अ फक्त (2) अ, ब आणि क फक्त

(3) क आणि ड फक्त (4) अ, ब, क आणि ड

Which of the following States has/have bicameral legislature?

(a) Andhra Pradesh (b) Telangana

(c) Bihar (d) Uttar Pradesh

Select the correct answer using the code given below:

(1) a only (2) a, b and c only

(3) c and d only (4) a, b, c and d

4. विधानसभेच्या (आमदार) सदस्यांच्या संख्येनुसार भारतातील सर्वात लहान विधानसभा _____ आहे.

(1) दिल्ली (2) गोवा

(3) सिक्कीम (4) पुदुचेरी

The smallest Vidhan Sabha in India, in terms of number of Members of Legislative Assembly (MLAs), is _____.

(1) Delhi (2) Goa

(3) Sikkim (4) Puducherry

---

5. खालीलपैकी कोणाला राज्याची विधानसभा विसर्जित करण्याचा अधिकार आहे?

(1) राज्यपाल (2) विधानसभेचे अध्यक्ष

(3) मुख्यमंत्री (4) मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय

Who of the following is empowered to dissolve the Legislative Assembly of a State ?

(1) The Governor (2) The Speaker of Legislative Assembly

(3) The Chief Minister (4) The Chief Justice, High Court

---

6. वित्त विधेयकाशी संबंधित खालील विधाने विचारात घ्या.

(अ) जेव्हा राज्यपालांना वित्त विधेयक सादर केले जाते तेव्हा, ते आपली संमती देऊ शकतात, आपली संमती रोखू शकतात किंवा राष्ट्रपतींच्या संमतीसाठी विधेयक राखून ठेवू शकतात ; परंतु राज्य विधानमंडळाच्या पुनर्विचारासाठी ते विधेयक परत करू शकत नाहीत.

(ब) विधान परिषद जास्तीत जास्त 14 दिवसांच्या कालावधीसाठी वित्त विधेयक रोखू शकते किंवा विलंब करू शकते.

वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे/त?

(1) अ फक्त (2) ब फक्त

(3) अ आणि ब दोन्ही (4) अ आणि ब दोन्ही नाही

Consider the following statements related to a Money bill.

(a) When a Money Bill is presented to the Governor, he may give his assent, withhold his assent or reserve the bill for Presidential assent but cannot return the bill for reconsideration of the State Legislature.

(b) At the most, the Legislative Council can delay a Money bill for a period of 14 days.

Which of the above statement/s is/are correct?

(1) a only (2) b only

(3) Both a and b (4) Neither a nor b

7. विधान परिषदेच्या संदर्भात खालील विधाने विचारात घ्या.

(अ) जर विधेयक विधान परिषदेने मंजूर केले आणि विधानसभेने फेटाळले तर विधेयक रद्द होते आणि त्यास संसदेप्रमाणे संयुक्त बैठकीचा पर्याय नाही.

(ब) विधानपरिषद विधेयकास जास्तीत जास्त 4 महिने विलंब करू शकते.

(क) विधानपरिषद विधेयक प्रथमतः मांडू शकत नाही.

वरीलपैकी कोणते विधान/ने चुकीचे आहे/त?

(1) फक्त अ (2) फक्त ब आणि क

(3) फक्त अ आणि ब (4) फक्त क

Consider the following statements with regard to the legislative council.

(a) If the bill is passed by the council and rejected by the assembly then the bill is lapsed and there is no option of joint sitting as with the parliament.

(b) The council can delay the bill by maximum 4 months.

(c) The council cannot initiate a bill.

Which of the statement/s given above is/are incorrect?

(1) a only (2) b and c only

(3) a and b only (4) c only

---

8. भारतीय राज्यघटनेच्या कलम 170 (1) नुसार भारतातील एखाद्या राज्याच्या विधानसभेत सदस्यांची किमान आणि कमाल संख्या किती असू शकते?

(1) 60 पेक्षा कमी नाही आणि 450 पेक्षा जास्त नाही

(2) 40 पेक्षा कमी नाही आणि 450 पेक्षा जास्त नाही

(3) 60 पेक्षा कमी नाही आणि 500 पेक्षा जास्त नाही

(4) 40 पेक्षा कमी नाही आणि 500 पेक्षा जास्त नाही

What can be the minimum and maximum number of members in a legislative assembly of a state in India according to art. 170 (1)?

(1) Not less than 60 and not more than 450

(2) Not less than 40 and not more than 450

(3) Not less than 60 and not more than 500

(4) Not less than 40 and not more than 500



चाणक्य मंडल परिवार

9. राज्यातील विधानपरिषद निर्माण करणे किंवा रद्द करण्याचा अधिकार खालीलपैकी कोणाकडे आहे?

(1) राज्य मंत्र्यांची परिषद  (2) राज्याचे राज्यपाल

(3) राज्य विधानसभा  (4) भारताचे राष्ट्रपती

The power to create or abolish legislative council in the state is vested with which among the following?

(1) Council of state ministers  (2) Governor of the state

(3) State legislative assembly  (4) President of india

---

10. भारतातील एखाद्या राज्याच्या विधानसभेच्या संदर्भात, खालील विधाने विचारात घ्या:

(अ) वर्षाच्या पहिल्या सत्राच्या प्रारंभी राष्ट्रपती सदनाच्या सदस्यांना नेहमीचे भाषण करतात.

(ब) जेव्हा एखाद्या राज्य विधानमंडळाचा एखाद्या विशिष्ट विषयावर नियम नसतो, तेव्हा ते त्या विषयावर लोकसभेच्या नियमाचे पालन करते.

वरीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे/आहेत?

(1) अ फक्त  (2) ब फक्त

(3) अ आणि ब दोन्ही  (4) अ आणि ब नाही

With reference to the Legislative Assembly of a state in India, consider the following statements:

(a) The President makes a customary address to Members of the House at the commencement of the first session of the year.

(b) When a State Legislature does not have a rule on a particular matter, it follows the Lok sabha rule on that matter.

Which of the statements given above is/are incorrect?

(1) a only  (2) b only

(3) Both a and b  (4) Neither a nor b

---

11. राज्य विधानमंडळाची संघटना, रचना, कालावधी, अधिकारी, कार्यपद्धती, विशेषाधिकार आणि अधिकार यांच्याशी संबंधित असलेले कलम कोणते आहेत?

(1) कलम 168 ते 212  (2) कलम 53 ते 112

(3) कलम 124 ते 147  (4) कलम 101 ते 121

What are the articles that deal with the organization, composition, duration, officers, procedures, privileges, and powers of the state legislature?

(1) Articles 168 to 212  (2) Articles 53 to 112

(3) Articles 124 to 147  (4) Articles 101 to 121



चाणक्य मंडल परिवार

12. विधानसभेच्या अध्यक्षांना खालीलपैकी कोणते अधिकार आहेत?

(अ) ते विधानसभेतील संविधानाच अर्थ मांडणारे अंतिम व्यक्ती असतात.

(ब) ते विधानसभेच्या सदस्यांच्या अपात्रतेच्या प्रश्नांवर निर्णय घेतात आणि त्यांचा निर्णय न्यायालयीन पुनरावलोकनाच्या अधीन नाही.

पर्यायी उत्तरे :

(1) अ फक्त

(2) ब फक्त

(3) अ आणि ब दोन्ही

(4) वरीलपैकी एकही नाही

Which of the following powers are enjoyed by the speaker of the Legislative Assembly?

(a) He is the final interpreter of the constitution within the assembly.

(b) He decides over the questions of disqualification of the members of the legislative assembly and his decision is not subject to judicial review.

Answer options :

(1) Only a

(2) Only b

(3) Both a and b

(4) None of the above

---

13. खालीलपैकी कोणते विधान/ने चुकीचे/ची आहे?

(अ) संसदेत राज्यसभेच्या स्थानापेक्षा विधानपरिषदेचे राज्य विधानमंडळात कमी स्थान आहे.

(ब) विधान परिषदेचे एक तृतीयांश सदस्य दर दुसऱ्या वर्षी मुदत संपल्यानंतर निवृत्त होतात.

पर्यायी उत्तरे :

(1) अ आणि ब दोन्ही (2) अ आणि ब पैकी एकही नाही

(3) फक्त अ (4) फक्त ब

Which of the following is incorrect?

(a) Legislative council has a lesser position in the state legislature than the position of Rajya Sabha in the Parliament.

(b) One third of the members of the legislative council retire after the expiration of every second year.

Answer options :

(1) Both a and b (2) None of a and b

(3) Only a (4) Only b



चाणक्य मंडल परिवार

14. कोणत्या कलमात राज्यांच्या वार्षिक आर्थिक विवरणाची तरतूद आहे?

(1) कलम 202 (2) कलम 203

(3) कलम 204 (4) कलम 201

Which article provides for the annual financial statement of states?

(1) Article 202 (2) Article 203

(3) Article 204 (4) Article 201

---

15. खालीलपैकी कोणते विधान/ने बरोबर आहे/त?

(अ) राज्य विधिमंडळाच्या दोन सभागृहांमध्ये सामान्य विधेयकावरून मतभेद निर्माण झाल्यास, घटनेत दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीची कोणतीही यंत्रणा उपलब्ध नाही.

(ब) जेव्हा विधेयक पुनर्विचरार्थ पाठवले जाते तेव्हा राज्याच्या राज्यपालांना केवळ निलंबनाचा व्हेटो मिळतो.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त अ (2) फक्त ब

(3) अ आणि ब दोन्ही (4) वरीलपैकी एकही नाही

Which of the following statement/s is/are correct?

(a) In case of a deadlock over an ordinary bill between the two houses of a state legislature, the constitution provides no mechanism of joint sitting of the two houses.

(b) The governor of a state enjoys only suspensive veto when the bill is returned for reconsideration.

Answer options :

(1) Only a (2) Only b

(3) Both a and b (4) None of the above

---

16. विधान परिषदेचे संख्याबळ किती असते?

(1) विधानसभेच्या संख्याबळाच्या एक चतुर्थांश आणि किमान संख्याबळ 40 इतके निश्चित केले आहे.

(2) विधानसभेच्या संख्याबळाच्या निम्मे आणि किमान संख्याबळ 40 इतके निश्चित केले आहे.

(3) विधानसभेच्या संख्याबळाचा एक पंचमांश आणि किमान संख्याबळ 40 इतके निश्चित केले आहे.

(4) विधानसभेच्या संख्याबळाच्या एक तृतीयांश आणि किमान संख्याबळ 40 इतके निश्चित केले आहे.

What is the strength of the legislative council fixed at?

(1) One fourth of the strength of the legislative assembly and the minimum strength is fixed at 40.

(2) Half of the strength of the legislative assembly and the minimum strength is fixed at 40

(3) One fifth of the strength of the legislative assembly and the minimum strength is fixed at 40.

(4) One third of the strength of the legislative assembly and the minimum strength is fixed at 40.



चाणक्य मंडळ परिवार

17. विधान परिषदेच्या संख्याबळाबद्दल खालीलपैकी कोणते विधान खरे आहे?

(1) एकूण सदस्यांपैकी 5/6 सदस्य अप्रत्यक्षपणे निवडले जातात.

(2) त्याची वास्तविक संख्या राज्य विधानसभेद्वारे निश्चित केली जाते.

(3) त्याची कमाल आणि किमान मर्यादा सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केली आहे.

(4) वरीलपैकी एकही नाही.

Which of the following statements is true about the strength of the Legislative Council?

(1) 5/6 of its total members are indirectly elected.

(2) Its actual strength is fixed by the state legislative assembly.

(3) Its maximum and minimum limits have been fixed by the Supreme Court.

(4) None of the above.

---

18. राष्ट्रपतीद्वारे राज्य विधानसभा विसर्जित करण्याची तरतूद संविधानातील कलम __________ मध्ये आहे:

(1) कलम 256 (2) कलम 356

(3) कलम 150 (4) कलम 251

The article in the constitution that provides for the dissolution of a state assembly by the president is :

(1) Article 256 (2) Article 356

(3) Article 150 (4) Article 251

---

19. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात, संसद विधानसभेचा कालावधी एका वेळी एक वर्षाच्या कालावधीने वाढवू शकते.

(ब) ही वाढ फक्त दोन वेळा करता येते.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर नाहीत?

(1) फक्त अ (2) फक्त ब

(3) अ व ब दोन्ही (4) अ व ब दोन्ही नाहीत

Consider the following statements.

(a) During national emergency, the parliament can extend the term of legislative assembly by a period of one year at a time.

(b) This extension can be done only twice.

Which of the statement/s are not true?

(1) Only a (2) Only b

(3) Both a and b (4) Both a and b are not

20. खालीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/त?

(अ) विधानपरिषदेचे सदस्य होण्यासाठी व्यक्तीचे किमान वय 25 वर्षे आहे.

(ब) RPA (1951) मध्ये नमूद केलेल्या कारणास्तव राज्य विधानसभेच्या सदस्यांच्या अपात्रतेच्या प्रश्नावर राज्यपाल निर्णय घेतात.

(क) दहाव्या अनुसूचीअंतर्गत राज्य विधानसभेच्या सदस्यांच्या अपात्रतेच्या प्रश्नावर राज्य विधान परिषदेत अध्यक्ष आणि राज्य विधानसभेत सभापती ठरवतात.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त अ आणि क

(2) ब आणि क फक्त

(3) अ, ब आणि क

(4) वरील सर्व

Which of the following statement/s is/are correct?

(a) Minimum age for a person to be a member of the legislative council is 25 years.

(b) The question of disqualification of members of state legislative assembly on the grounds mentioned in RPA (1951) is decided by the governor.

(c) The question of disqualification of members of state legislative assembly under the Tenth schedule is decided by the Chairman (in the state legislative council) and by the Speaker (in the state legislative assembly).

Answer options :

(1) a and c only

(2) b and c only

(3) a, b and c

(4) All of the above

---

21. योग्य पर्याय वापरून विधान पूर्ण करा.

राज्य विधिमंडळाचा कोणताही सदस्य परवानगीशिवाय ____________ इतक्या कालावधीसाठी सर्व बैठकांना अनुपस्थित राहिला तर संबंधित सदस्याची जागा रिक्त म्हणून घोषित केली जाऊ शकते.

(1) तीस दिवस (2) साठ दिवस

(3) नव्वद दिवस (4) चाळीस दिवस

Complete the following statement by filling appropriate option.

The seat of any member of state legislature can be declared as vacant if he remains absent from all its meetings for a period of ___________ Days without permission.

(1) Thirty days (2) Sixty days

(3) Ninety days (4) Forty days



चाणक्य मंडल परिवार

22. राज्य विधानपरिषदेतील सदस्याचे नामनिर्देशन करताना, राज्यपाल ______________ या संदर्भात विशेष ज्ञान किंवा व्यावहारिक अनुभव असलेल्या व्यक्तीचा विचार करतात.

(अ) साहित्य
(ब) खेळ
(क) विज्ञान
(ड) कला
(इ) सहकारी चळवळ
(फ) समाज सेवा

योग्य पर्याय निवडा

(1) वरीलपैकी सर्व
(2) अ, ब, ड, इ, फ
(3) अ, क, ड, इ, फ
(4) अ, ब, क, ड, फ

While nominating a member in State Legislative Council, Governor considers person having special knowledge or practical experience in respect of

(a) Literature
(b) Sports
(c) Science
(d) Art
(e) Co-operative movement
(f) Social service

Choose correct option

(1) All of these
(2) a, b, d, e, f
(3) a, c, d, e, f
(4) a, b, c, d, f

---

23. खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे?

(अ) राज्यपाल हे विधान परिषदेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात.
(ब) विधानसभेचे अध्यक्ष विधान परिषदेचे अध्यक्ष म्हणूनही काम करतात.
(क) राज्य विधान परिषद तिच्या सदस्यांमधून स्वतःचे अध्यक्ष निवडते.

पर्यायी उत्तरे:

(1) अ आणि ब
(2) अ आणि क
(3) फक्त क
(4) यापैकी नाही

Which one of the following statements is correct?

(a) The Governor is the ex-officio Chairman of the Legislative Council.
(b) The Speaker of the Legislative Assembly also acts as the Chairman of the Legislative Council.
(c) The State legislative Council elects its own Chairman from amongst its members.

Answer options:

(1) a and b
(2) a and c
(3) Only c
(4) None of these



चाणक्य मंडल परिवार

24. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) भारतातील एखाद्या राज्याची विधानसभा मध्यावधीत विसर्जित झाल्यास, पुढील विधानसभेच्या स्थापनेच्या प्रक्रियेपर्यंत सभापती पदावर राहतात.

(ब) विधानसभेचे अध्यक्ष राजीनामा देतात तेव्हा ते त्यांचे पत्र विधानसभेच्या उपसभापतींना पाठवतात.

वर दिलेल्या विधानांपैकी कोणते बरोबर आहे/आहे?

(1) फक्त अ

(2) अ आणि ब दोन्ही

(3) फक्त ब

(4) अ आणि ब दोन्ही नाही

Consider the following statements.

(a) If the Legislative Assembly of a State in India is dissolved in mid-term, the Speaker continues in office till the process of formation of the next Legislative Assembly.

(b) When the Speaker of a Legislative Assembly resigns he addresses his letter to the Deputy-speaker of the Assembly.

Which of the statements given above is/are correct?

(1) Only a

(2) Both a and b

(3) Only b

(4) Neither a nor b

---

25. विधानसभा अध्यक्षाबाबत खालील विधानांपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(1) विधानसभा अध्यक्षास पदावरून दूर करण्याचा ठराव विचाराधीन असतांना त्यांना सभागृहाचे अध्यक्षस्थान स्विकारता येणार नाही.

(2) त्यांना सभागृहात उपस्थित राहून कामकाजात भाग घेता येणार नाही.

(3) त्यांना अशा ठरावावर अन्य सामान्य सभासदाप्रमाणे फक्त पहिल्याच फेरीत मतदान करता येईल.

(4) त्यांना अशा ठरावावर सम समान मत विभागणी झाल्यास निर्णायक मत देता येणार नाही.

Which of the following statements about the Speaker of the Legislative Assembly is incorrect?

(1) The speaker of the Legislative Assembly cannot assume the presidency of the House while the resolution to remove him from office is under consideration.

(2) They cannot be present in the hall and participate in the proceedings.

(3) On such a resolution he can vote in the first instance like any other ordinary member.

(4) He cannot cast a casting vote in case of tie on such a resolution.



चाणक्य मंडल परिवार

26. विधानसभेच्या अध्यक्षाबाबत (सभापती) खालील विधाने विचारात घ्या.

(अ) त्याचे विधानसभेचे सदस्यत्व संपुष्टात आले तर त्यास आपले पद रिक्त करावे लागते.

(ब) आपल्या पदाचा, स्वतःचा सहीनिशी लेखी राजीनामा, राज्यपालास संबोधून कोणत्याही वेळी देता येईल.

(क) विधानसभेच्या हजर राहून मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने ठराव पारित करून त्यांना पदावरून दूर करता येईल.

(ड) पदावरून दूर करण्यासंबंधीचा ठराव, तो मांडण्याचा उद्देश कळविल्यापासून, निदान एक महिन्याची नोटीस देण्यात आल्याशिवाय मांडला जाणार नाही.

वरीलपैकी कोणते विधान / विधाने बरोबर आहेत?

(1) अ, ब आणि क (2) अ, क आणि ड

(3) ब आणि क (4) फक्त अ

Consider the following statements about the Speaker of the Legislative Assembly (Chairman).

(a) If his membership of the Legislative Assembly ceases, he has to vacate his office.

(b) Resignation of his office, in writing under his own signature, addressed to the Governor at any time.

(c) He may be removed from office by a resolution passed by a majority of the members present and voting in the Legislative Assembly.

(d) A resolution for removal from office shall not be moved unless at least one month's notice has been given of the intention to move it.

Which of the above statements are correct?

(1) a, b and c (2) a, c and d

(3) b, c, d (4) Only a

---

27. राज्य विधानमंडळात विशेष बहुमत म्हणजे काय?

(1) उपस्थित आणि मतदान करणार्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश सदस्यांनी होय मत देणे आवश्यक आहे आणि ही संख्या त्या सभागृहाच्या एकूण सदस्य क्षमतेच्या बहुसंख्य असणे आवश्यक आहे.

(2) उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश सदस्यांनी होय मत देणे आवश्यक आहे.

(3) उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश सदस्यांनी होय मत देणे आवश्यक आहे आणि त्या सदनाच्या एकूण सदस्य क्षमतेच्या दोन तृतीयांश बहुमत असणे आवश्यक आहे.

(4) वरीलपैकी काहीही नाही

What does special majority mean in state legislatures?

(1) Two-thirds of present and voting members must vote yes, and this number must also constitute the majority of the total capacity of membership of that House.

(2) Two-thirds of present and voting members must vote yes.

(3) Two-thirds of present and voting members must vote yes, and there should also be two-thirds majority of the total capacity of membership of that house.

(4) None of the above.



चाणक्य मंडल परिवार

28. खालील विधाने विचारात घ्या आणि चुकीची विधाने ओळखा.

(अ) राज्य विधिमंडळाच्या दोन अधिवेशनांमधील किमान अंतर 6 महिन्यांपेक्षा जास्त असू शकत नाही.

(ब) राज्य विधानसभेने वर्षातून किमान दोनदा उत्तर पर्यायांची बैठक घेतली पाहिजे.

पर्यायी उत्तरे :

(1) अ फक्त

(2) ब फक्त

(3) अ आणि ब दोन्ही

(4) अ आणि ब दोन्ही नाही

Consider the following statements and identify the incorrect statement/s.

(a) The minimum gap between the two sessions of the state legislature cannot be more than 6 months.

(b) The state legislature should meet at least twice a year answer options.

(1) a only

(2) b only

(3) Both a and b

(4) Neither a nor b

---

29. कोणतेही विधेयक प्रलंबित असताना विधानसभा विसर्जित झाली तर विधेयकाचे काय होईल?

(1) विधेयक रद्द होते.

(2) विधेयक दुसऱ्या अधिवेशनापर्यंत प्रलंबित राहते.

(3) विधेयक विधान परिषदेकडे पाठवले जाते.

(4) वरीलपैकी काहीही नाही.

If the legislative assembly dissolves while any bill is pending, then what becomes of the bill?

(1) Bill lapses

(2) Bill remains till another session

(3) The Bill is sent to legislative council

(4) None of the above



चाणक्य मंडल परिवार

30. कोरम म्हणजे सदनात (राज्य विधानसभेसाठी) उपस्थित राहण्यासाठी आवश्यक असलेल्या सदस्यांची किमान संख्या __________ आहे.

(1) 20 सदस्य किंवा सदनाच्या संख्येच्या एक दशांश (पीठासीन अधिकाऱ्यासह) यापैकी जी जास्त असेल ती संख्या

(2) 10 सदस्य किंवा सदनाच्या संख्येच्या एक दशांश (पीठासीन अधिकाऱ्यासह) यापैकी जी जास्त असेल ती संख्या

(3) 20 सदस्य किंवा सदनाच्या संख्येच्या एक दशांश (पीठासीन अधिकारी वगळून) यापैकी जी जास्त असेल ती संख्या

(4) 10 सदस्य किंवा सदनाच्या संख्येच्या एक दशांश (पीठासीन अधिकारी वगळून) जी जास्त असेल ते ती संख्या

Quorum i.e minimum number of members required to be present in the house (for state legislative assemblies) is _____________.

(1) 20 members or one-tenth of the house (including presiding officer) whichever is greater

(2) 10 members or one-tenth of the house (including presiding officer) whichever is greater

(3) 20 members or one-tenth of the house (excluding presiding officer) whichever is greater

(4) 10 members or one-tenth of the house (excluding presiding officer) whichever is greater

---

31. राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करण्यासाठी दिवस नेमून दिला असला तरीही :

(अ) विधेयक किंवा विधेयके मांडण्याची परवानगी मिळविण्यासाठी एक किंवा अनेक प्रस्ताव आणता येतील आणि अशा दिवशी विधेयक किंवा विधेयके मांडता येतील.

(ब) विधानसभेने राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा सुरू करण्यापूर्वी किंवा ती पुढे चालू करण्यापूर्वी औपचारिक स्वरुपाचे इतर कामकाज करता येईल.

पर्यायी उत्तरे :

(1) विधान अ बरोबर आहे परंतु ब चूक आहे. (2) विधान ब बरोबर परंतु अ चूक आहे.

(3) अ आणि ब दोन्ही विधाने बरोबर आहेत. (4) अ आणि ब दोन्ही विधाने चूक आहेत.

Even if a day is alloted to discuss the Governor's address:

(a) One or more motions may be moved for permission to introduce a bill or bills and the bill or bills may be introduced on such a day.

(b) The Legislative Assembly may conduct other business of a formal nature before commencing or proceeding with the discussion of the Governor's Address.

Answer options :

(1) Statement a correct but b incorrect (2) Statement b correct but a incorrect

(3) Statement a and b both are correct (4) Statement a and b both are incorrect

---

32. खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?

(1) जर विधान सभेने मंजूर केलेले सामान्य विधेयक (ordinary bill) विधान परिषदेने फेटाळले अथवा तीन महिन्यात मंजूरही केले नाही तर विधान सभा पुन्हा ते विधेयक मंजूर करुन विधान परिषदेकडे पाठविते.

(2) दुसऱ्या प्रसंगात जर तेच विधेयक पुन्हा विधान परिषदेने फेटाळले अथवा 14 दिवसांच्या आत मंजूर केले नाही तर ते विधेयक दोन्ही सभागृहांनी मंजूर केले आहे असे समजले जाते.

(3) जर विधान परिषदेने मंजूर केलेले विधेयक विधान सभेकडे मंजूरीसाठी पाठविले आणि ते विधान सभेने फेटाळले तर त्या विधेयकाचा तेथेच अंत होतो.

(4) वरीलपैकी एकही नाही.

Which one of the following statements is incorrect?

(1) If an ordinary bill is passed by the Legislative Assembly and the Legislative Council rejects the bill or does not pass the bill within 3 months, the Legislative Assembly may again pass the bill and transmit it to the council again.

(2) If on the second occasion, the council again rejects the bill or does not pass it within 14 days,the bill shall be deemed to have been passed by both houses.

(3) If a bill passed by the legislative council and transmitted to the Assembly and rejected by the Assembly, there is an end to the bill.

(4) None of the above.

---

33. विधानसभेच्या विसर्जनानंतर विधेयके रद्द करण्याच्या संदर्भात स्थितीबद्दल योग्य विधाने निवडा.

(अ) विधानसभेने मंजुर केलेले, परंतू विधान परिषदेत प्रलंबित असलेले विधेयक रद्द होते.

(ब) विधान परिषदेत प्रलंबित असलेले परंतू विधानसभेने मंजुर न केलेले विधेयक रद्द होते.

(क) विधानसभेने संमत केलेले (एकसदनात्मक राज्य) किंवा दोन्ही सभागृहांनी पारित केलेले विधेयक (द्विसदनात्मक राज्य) परंतू राज्यपाल किंवा राष्ट्रपतींच्या संमतीसाठी प्रलंबित असेल, ते विधेयक रद्द होत नाही.

पर्यायी उत्तरे :

(1) अ आणि ब फक्त (2) ब आणि क फक्त

(3) अ आणि क फक्त (4) वरील सर्व

Select the correct statements about the position with respect to lapsing of bills on the dissolution of the Legislative Assembly.

(a) A Bill passed by the Legislative Assembly but pending in the Legislative Council lapses.

(b) A Bill pending in the Legislative Council but not passed by the Legislative Assembly, lapses.

(c) A Bill passed by the Legislative Assembly (in a unicameral state) or passed by both the houses (in a bicameral state) but pending assent of the Governor or President does not lapse.

Answer options:

(1) Only a and b (2) Only b and c

(3) Only a and c (4) All of the above

34. खालीलपैकी कोणत्या संसद आणि राज्यविधीमंडळ या दोहोंमध्ये समान प्रक्रिया पार पाडल्या जातात ?

(अ) एखादे विधेयक (अर्थ विधेयक नाही) कोणत्याही सभागृहात पास केले जाते.

(ब) अर्थ विधेयक फक्त कनिष्ठ सभागृहात (लोकसभा आणि विधानसभा) प्रथमतः सादर केले जाते.

(क) सामान्य विधेयक कोणताही मंत्री अथवा खाजगी सदस्याद्वारे सादर केले जाऊ शकते.

(ड) सामान्य विधेयकावरून सभागृहामधील गतिरोधाच्या टप्प्यावर दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक होऊ शकते.

पर्यायी उत्तरे :

| | |
|---|---|
| (1) फक्त अ, ब आणि क | (2) फक्त ड |
| (3) फक्त क आणि ड | (4) वरीलपैकी सर्व |

Which among the following are the common procedures for both the Parliament and the State Legislature?

(a) A bill (not a money bill) can be passed in either House.

(b) Money bill can only originate in the Lower House (Lok Sabha and Vidhan Sabha).

(c) An ordinary bill can be introduced either by the minister or private members.

(d) At the point of a deadlock between the houses over an ordinary bill, there can be a joint sitting of both Houses.

Answer options :

| | |
|---|---|
| (1) Only a, b and c | (2) Only d |
| (3) Only c and d | (4) all of the above |

---

35. खालीलपैकी कोणत्या राज्यांनी त्यांच्या राज्यात विधान परिषद बरखास्त केली आहे ?

(अ) पश्चिम बंगाल

(ब) पंजाब

(क) तामिळनाडू

पर्यायी उत्तरे:

| | |
|---|---|
| (1) फक्त अ, ब | (2) फक्त ब, क |
| (3) फक्त अ, क | (4) वरीलपैकी सर्व |

Which of the following States have abolished the Legislative Council in their State?

(a) West Bengal

(b) Punjab

(c) Tamil Nadu

Answer options:

| | |
|---|---|
| (1) Only a, b | (2) Only b, c |
| (3) Only a, c | (4) All of the above |

चाणक्य मंडल परिवार

36. कोणत्याही राज्यातील विधानपरिषद याद्वारे तयार केली जाते:

(1) संसदेद्वारे, जर संबंधित राज्याने तसा ठराव संमत केला तर

(2) संबंधित राज्याच्या राज्यपालाची इच्छा असल्यास संसदेद्वारे.

(3) राज्य विधानसभेद्वारे स्वतःहून.

(4) राज्य विधानसभेद्वारे आणि नंतर राष्ट्रपतींनी मान्य केल्यास

Legislative council in any state is created by:

(1) The parliament, if the concerned state passes a resolution to that effect.

(2) The parliament, if the governor of the concerned state wishes so.

(3) The state legislative assembly on its own.

(4) The state legislative assembly and then agreed by the president

---

37. राज्यपालांनी राष्ट्रपतींच्या विचारार्थ विधेयक राखून ठेवण्याबाबत खालील विधाने विचारात घ्या.

(अ) राष्ट्रपती विधेयकाला आपली संमती देऊ शकतात किंवा बिलाला आपली संमती नाकारू शकतात किंवा राज्य विधानमंडळाच्या सभागृह किंवा सभागृहांच्या पुनर्विचारासाठी विधेयक परत करू शकतात.

(ब) जेव्हा एखादे विधेयक असे परत केले जाते, तेव्हा तीन महिन्यांच्या कालावधीत सभागृह किंवा सभागृहांनी त्यावर पुनर्विचार करावा लागतो.

(क) अशा विधेयकाला राष्ट्रपतींनी संमती देणे बंधनकारक आहे की नाही याचा घटनेत उल्लेख नाही.

वरीलपैकी कोणते विधान/ने चुकीचे आहे/आहेत?

(1) फक्त अ आणि क (2) फक्त ब

(3) वरीलपैकी काहीही नाही (4) फक्त क

Consider the following statements about a bill reservation by the governor for the consideration of the President.

(a) The President may either give his assent to the bill or withhold his assent to the bill or return the bill for reconsideration of the House or Houses of the state legislature.

(b) When a bill is so returned, the House or Houses have to reconsider it within a time period of three months.

(c) It is not mentioned in the Constitution whether it is obligatory on the part of the president to give his assent to such a bill or not.

Which of the statement/s above is/are incorrect?

(1) a and c only (2) b only

(3) None of the above (4) c only

38. खालीलपैकी कोणती विधान/विधाने खरी आहे/त?
(अ) राज्य सूचीमध्ये नमूद केलेल्या काही बाबींची विधेयके राष्ट्रपतींच्या पूर्व मंजुरीनेच राज्य विधानसभेत मांडली जाऊ शकतात.
(ब) संसदेचा कायदा राज्यातील अनुसूचित क्षेत्राला लागू होत नाही किंवा विशिष्ट बदल आणि अपवादांसह लागू होत नाही असे निर्देश देण्याचा अधिकार राज्यपालांना आहे.
खालील पर्यायांमधून योग्य उत्तर निवडा:
(1) अ फक्त (2) ब फक्त
(3) अ आणि ब दोन्ही (4) अ आणि ब दोन्ही नाही
Which of the following statements is/are true?
(a) Bills on certain matters enumerated in the State List can be introduced in the state legislature only with the previous sanction of the President.
(b) The Governor is empowered to direct that an act of Parliament does not apply to a scheduled area in the state or apply with specified modifications and exceptions
Choose the correct answer from the options given below:
(1) a only (2) b only
(3) Both a and b (4) Neither a nor b

---

39. खालीलपैकी कोणत्या भारतीय राज्यात विधानसभेच्या सर्वाधिक जागा आहेत?
(1) मध्य प्रदेश (2) आंध्र प्रदेश
(3) कर्नाटक (4) उत्तर प्रदेश
Which of the following Indian state has the maximum number of Vidhan Sabha seats in the House?
(1) Madhya Pradesh (2) Andhra Pradesh
(3) Karnataka (4) Uttar Pradesh

---

40. खालील विधाने विचारात घ्या आणि योग्य विधाने ओळखा.
(अ) 1956 च्या 7 व्या दुरुस्ती कायद्याने मध्यप्रदेशात विधान परिषदेची तरतूद केली.
(ब) सध्या मध्य प्रदेश राज्यात द्विसदनीय विधानसभा आहे.
पर्यायी उत्तरे :
(1) फक्त ब (2) फक्त अ
(3) अ आणि ब दोन्ही (4) अ आणि ब दोन्ही नाही
Consider the following statements and identify the correct statement/s.
(a) The $7^{th}$ Amendment Act of 1956 provided for a Legislative Council in Madhya Madhya Pradesh.
(b) Currently Madhya Pradesh state has a bicameral legislature.
Answer options:
(1) b only (2) a only
(3) Both a and b (4) Neither a nor b

41. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) 104 व्या घटनादुरुस्ती कायद्यापूर्वी,जर अँग्लो-इंडियन समाजाचे राज्य विधानसभेत पुरेसे प्रतिनिधित्व नसेल तर समुदायातील दोन सदस्यांना राज्याच्या राज्यपालांकडून नामनिर्देशित केले जात असे.

(ब) भारतीय संविधानाच्या 104 व्या घटनादुरुस्तीने राज्य विधानसभेतील अँग्लो-इंडियन्ससाठीचे आरक्षण बंद केले.

वरीलपैकी कोणते विधान बरोबर/नाही?

(1) अ फक्त
(2) ब फक्त
(3) अ आणि ब दोन्ही
(4) वरीलपैकी एकही नाही

Consider the following statements.

(a) Prior to the 104th constitutional amendment act, two members from the Anglo-Indian community used to be nominated by the governor of state if the community was not adequately represented in the state legislative assembly.

(b) the $104^{th}$ Amendment of the Indian Constitution ceased the reservation of seats for the Anglo-Indians in the State Legislative Assemblies.

Which of the statements above is/are not correct?

(1) a only
(2) b only
(3) Both a and b
(4) None of the above

---

42. खालीलपैकी कोणत्या घटनादुरुस्त्या राज्य विधानसभेत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या आरक्षणासंबंधित आहे?

(अ) 95वी घटनादुरुस्ती
(ब) 104 वी घटनादुरुस्ती
(क) 42 वी घटनादुरुस्ती
(ड) 62 वी घटनादुरुस्ती

पर्यायी उत्तरे:

(1) अ, ब, क, ड
(2) अ, ब, क
(3) अ, ब, ड
(4) ब, क, ड

Which of the following constitutional amendments deals with the reservation of Scheduled Castes and Scheduled Tribes in the State Assembly?

(a) $95^{th}$ Amendment
(b) $104^{th}$ Amendment
(c) $42^{nd}$ Amendment
(D) $62^{nd}$ Amendment

Alternative Answers:

(1) a, b, c, d
(2) a, b, c
(3) a, b, d
(4) b, c, d

43. खालील विधाने विचारात घ्या आणि त्यापैकी कोणते/ती योग्य आहे/त ते ओळखा.

(अ) विशिष्ट विधेयक हे वित्त विधेयक आहे की नाही हे ठरवण्याचा अंतिम अधिकार विधानसभेच्या अध्यक्षांकडे आहे.

(ब) विधानपरिषद अर्थसंकल्पावर चर्चा करू शकते आणि अनुदानाच्या मागण्यांवर मतदान करू शकते.

(क) विधानपरिषद भारताच्या राष्ट्रपती आणि राज्यसभेतील राज्याच्या प्रतिनिधींच्या निवडणुकीत भाग घेते.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त ब आणि क (2) फक्त ब

(3) फक्त अ आणि क (4) फक्त अ

Consider the following statements and identify which of them is/are correct.

(a) The final power to decide whether a particular bill is a money bill or not is vested in the Speaker of the assembly.

(b) The council can discuss the budget and vote on the demands for grants.

(c) The council participates in the election of the president of India and representatives of the state in the Rajya Sabha.

Answer options:

(1) b and c only (2) b only

(3) a and c only (4) a only

---

44. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) राज्यघटनेने राज्य विधिमंडळाचे विशेषाधिकार राज्याचे महाधिवक्ता आणि राज्यमंत्र्यांना दिले आहेत.

(ब) राज्य विधानमंडळाचे विशेषाधिकार राज्याच्या राज्यपालांना देखील दिले जातात जे राज्य विधानमंडळाचा अविभाज्य भाग आहेत.

वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे/आहेत?

(1) फक्त अ (2) फक्त ब

(3) अ आणि ब दोन्ही (4) वरीलपैकी एकही नाही

Consider the following statements.

(a) The Constitution has extended the privileges of the state legislature to advocate general of the state and state ministers.

(b) Privileges of the state legislature are also extended to the governor of the state who is an integral part of the state legislature.

Which of the statements above is/are correct?

(1) a only (2) b only

(3) Both a and b (4) None of the above

45. खालीलपैकी कोणते सामूहिक विशेषाधिकार राज्य विधिमंडळाच्या सभागृहांचे आहेत?

(अ) ते आपल्या कार्यवाहीतून अनोळखी व्यक्तींना वगळू शकतात आणि काही महत्त्वाच्या बाबींवर चर्चा करण्यासाठी गुप्त बैठका आयोजित करू शकतात.

(ब) ते स्वतःची कार्यपद्धती आणि त्याच्या कामकाजाचे नियमन करण्यासाठी आणि अशा प्रकरणांवर निर्णय घेण्यासाठी नियम बनवू शकतात.

(क) ते सदस्यांना तसेच बाहेरील लोकांना त्याच्या विशेषाधिकारांचे उल्लंघन केल्याबद्दल किंवा त्याचा अवमान केल्याबद्दल फटकार, उपदेश किंवा कारावास (सदस्यांच्या बाबतीत निलंबन किंवा निष्कासन देखील) शिक्षा करू शकतात.

(ड) त्यांना एखाद्या सदस्याची अटक, अटक, दोषी, तुरुंगवास आणि सुटकेची त्वरित माहिती प्राप्त करण्याचा अधिकार आहे.

पर्यायी उत्तरे:

(1) अ, क आणि ड (2) अ, ब आणि क

(3) ब, क आणि ड (4) अ, ब, क, ड

Which of the following are collective privileges belonging to the houses of the state legislature?

(a) It can exclude strangers from its proceedings and hold secret sittings to discuss some important matters.

(b) It can make rules to regulate its own procedure and the conduct of its business and to adjudi- cate upon such matters.

(c) It can punish members as well as outsiders for breach of its privileges or its contempt by reprimand, admonition or imprisonment (also suspension or expulsion, in case of members).

(d) It has the right to receive immediate information of the arrest, detention, conviction, imprison- ment and release of a member.

Answer options:

(1) a, c and d (2) a, b and c

(3) b, c and d (4) a, b, c, d

चाणक्य मंडल परिवार

46. खालील विधाने विचारात घ्या आणि त्यापैकी कोणते/ती योग्य आहे/त ते ओळखा.

(अ) राज्य विधिमंडळाच्या सदस्यांना राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान आणि अधिवेशन सुरू होण्याच्या 60 दिवस आधी आणि असे अधिवेशन संपल्यानंतर 60 दिवसांनंतर अटक करता येत नाही.

(ब) हा विशेषाधिकार दिवाणी प्रकरणांमध्ये आणि फौजदारी खटल्यांमध्ये किंवा प्रतिबंधात्मक अटकेत दोन्हीमध्ये उपलब्ध आहे.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त ब (2) फक्त अ

(3) अ आणि ब दोन्ही (4) अ आणि ब दोन्ही नाही

Consider the following statements and identify which of them is/are correct.

(a) Members of the state legislature cannot be arrested during the session of the state legislature and 60 days before the beginning and 60 days after the end of such session.

(b) This privilege is available both in the civil cases and in the criminal cases or preventive detention.

Answer options :

(1) b only (2) a only

(3) Both a and b (4) Neither a nor b

---

47. खालीलपैकी कोणती विधाने बरोबर नाहीत?

(अ) राज्यघटनेने राज्याच्या अधिकृत भाषा, हिंदी किंवा इंग्रजी या राज्य विधानसभेतील कार्यवाहीसाठीच्या भाषा म्हणून घोषित केल्या आहेत.

(ब) तथापि, पीठासीन अधिकारी सदस्याला त्याच्या मातृभाषेत सभागृहाला संबोधित करण्याची परवानगी देऊ शकतात.

(क) इंग्रजी ही भाषेचा वापर सुरु ठेवायचा की बंद करायचा हे ठरवण्याचा अधिकार राज्य विधानसभेला आहे.

पर्यायी उत्तरे:

(1) फक्त क (2) फक्त अ

(3) फक्त ब (4) वरीलपैकी एकही नाही

Which of the following statements are not correct?

(a) The Constitution has declared the official language(s) of the state, Hindi or English, to be the languages for transacting business in the state legislature.

(b) However, the presiding officer can permit a mem- ber to address the House in his mother-tongue.

(c) The state legislature is authorized to decide whether to continue or discontinue English as a floor language.

Answer options:

(1) c only (2) a only

(3) b only (4) None of the above



चाणक्य मंडल परिवार

48. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) ज्या सभागृहाचा तो सदस्य नसतो, त्या सभागृहाच्या कामकाजात मंत्री भाग घेऊ शकत नाही.

(ब) कोणत्याही सभागृहाचा सदस्य नसलेला मंत्री दोन्ही सभागृहांच्या कामकाजात भाग घेऊ शकतो.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?

(1) फक्त अ (2) फक्त ब

(3) अ आणि ब दोन्ही (4) अ आणि ब पैकी नाही

Consider the following statements.

(a) A minister can not participate in the proceedings of a House, of which he is not a member.

(b) A minister, who is not a member of either House, can participate in the proceedings of both the Houses.

Which of the above statements are correct ?

(1) a only (2) b only

(3) Both a and b (4) Neither of a and b

---

49. जोड्या जुळवा.

(अ) कलम 169 (i) वार्षिक आर्थिक विवरण

(ब) कलम 200 (ii) पूरक, अतिरिक्त, जादा अनुदान

(क) कलम 202 (iii) विधान परिषद रद्द करणे किंवा निर्माण करणे

(ड) कलम 205 (iv) बिलांना संमती

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | i | ii | iii | iv |
| (2) | ii | iii | iv | i |
| (3) | iv | i | iii | ii |
| (4) | iii | iv | i | ii |

Match the pairs

(a) art. 169 (i) annual financial statement

(b) Art. 200 (ii) supplementary, additional, excess grants

(c) Art. 202 (iii) Abolition or creation of legislative council

(d) Art. 205 (iv) Assent to bills

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | i | ii | iii | iv |
| (2) | ii | iii | iv | i |
| (3) | iv | i | iii | ii |
| (4) | iii | iv | i | ii |

चाणक्य मंडल परिवार

50. विधीमंडळाच्या सुट्टीच्या वेळी अध्यादेश जारी करण्याचा राज्यपालांचा अधिकार भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ____________ मध्ये नमूद केला आहे.

(1) अनुच्छेद 123
(2) अनुच्छेद 213
(3) अनुच्छेद 312
(4) अनुच्छेद 211

Power of governor to promulgate Ordinance during recess of legislature is mentioned in article ____________ of the indian constitution.

(1) Article 123
(2) Article 213
(3) Article 312
(4) Article 211

चाणक्य मंडल परिवार